|| ॐ श्री परमात्मने नमः ||

|| ज्ञानेश्वरी भावार्थदीपिका ||

|| अथ श्रीमद् भगवद्गीता ||

|| अथ षष्ठोऽध्यायः - अध्याय सहावा ||

| ध्यानयोगः |

मग रायातें म्हणे संजयो | तोचि अभिप्रावो अवधारिजो |

कृष्ण सांगती आतां जो | योगरूप || १ ||

सहजें ब्रह्मरसाचें पारणें | केलें अर्जुनालागीं नारायणें |

कीं तेचि अवसरीं पाहुणे | पातलों आम्ही || २ ||

कैसी दैवाची आगळिक नेणिजे | जैसें तान्हेलिया तोय सेविजे |

कीं तेंचि चवी करूनि पाहिजे | तंव अमृत आहे || ३ ||

तैसें आम्हां तुम्हां जाहलें | जे आडमुठीं तत्त्व फावलें |

तंव धृतराष्ट्रें म्हणितलें | हें न पुसों तूतें ||४ ||

तया संजया येणें बोलें | रायाचें हृदय चोजवलें |

जें अवसरीं आहे घेतलें | कुमारांचिया || ५ ||

हें जाणोनि मनीं हांसिला | म्हणे म्हातारा मोहें नाशिला |

एऱ्हवीं बोलु तरी भला जाहला | अवसरीं इये || ६ ||

परि तें तैसें कैसेनि होईल | जात्यंधु कैसें पाहेल |

तेवींचि ये रुसें घेईल | म्हणौनि बिहे || ७ ||

परि आपण चित्तीं आपुला | निकियापरी संतोषला |

जे तो संवादु फावला | कृष्णार्जुनांचा ||८ ||

तेणें आनंदाचेनि धालेपणें | साभिप्राय अंतःकरणें |

आतां आदरेंसीं बोलणें । घडेल तया ॥ ९ ॥

तो गीतेमाजी षष्ठींचा । प्रसंगु असे आयणीचा ।

जैसा क्षीरार्णवीं अमृताचा । निवाडु जाहला ॥१० ॥

तैसें गीतार्थाचें सार । जें विवेकसिंधूचें पार ।

नाना योगविभवभांडार । उघडलें कां ॥ ११ ॥

जें आदिप्रकृतीचें विसवणें । जें शब्दब्रह्मासि न बोलणें ।

जेथूनि गीतावल्लीचें ठाणें । प्ररोहो पावे ॥ १२ ॥

तो अध्यावो सहावा । वरि साहित्याचिया बरवा ।

सांगिजैल म्हणौनि परिसावा । चित्त देउनी ॥ १३ ॥

माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजां जिंके ।

ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ १४ ॥

जिये कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचें रंग थोडे ।

वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ॥ १५ ॥

ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होति जिभा ।

बोले इंद्रियां लागे कळंभा । एकमेकां ॥ १६ ॥

सहजें शब्दु तरी विषो श्रवणाचा । परि रसना म्हणे हा रसु आमुचा ।

घ्राणासि भावो जाय परिमळाचा । हा तोचि होईल ॥ १७ ॥

नवल बोलतीये रेखेची वाहणी । देखतां डोळयांही पुरों लागे धणी ।

ते म्हणती उघडली खाणी । रूपाची हे ॥ १८ ॥

जेथ संपूर्ण पद उभारे । तेथ मनचि धांवे बाहिरें ।

बोलु भुजाही आविष्करें । आलिंगावया ॥ १९ ॥

ऐशीं इंद्रियें आपुलालिया भावीं । झोंबती परि तो सरिसेपणेंचि बुझावी ।

जैसा एकला जग चेववी | सहस्रकरु || २० ||

तैसें शब्दाचें व्यापकपण | देखिजे असाधारण |

पाहातयां भावज्ञां फावती गुण | चिंतामणीचे || २१ ||

हें असोतु या बोलांचीं ताटें भलीं | वरी कैवल्यरसें वोगरिलीं |

ही प्रतिपत्ति मियां केली | निष्कामासी || २२ ||

आतां आत्मप्रभा नीच नवी | तेचि करूनि ठाणदिवी |

जो इंद्रियांतें चोरूनि जेवी | तयासीचि फावे || २३ ||

येथ श्रवणाचेनि पांगें- | वीण श्रोतयां होआवें लागे |

हे मनाचेनि निजांगें | भोगिजे गा || २४ ||

आहाच बोलाची वालीफ फेडिजे | आणि ब्रह्माचियाचि आंगा घडिजे |

मग सुखेंसी सुरवाडिजे | सुखाचि माजीं || २५ ||

ऐसें हळुवारपण जरी येईल | तरीच हें उपेगा जाईल |

एऱ्हवीं आघवी गोठी होईल | मुकिया बहिरयाची || २६ ||

परी तें असो आतां आघवें | नलगे श्रोतयां कडसावें |

जे अधिकारिये एथ स्वभावें | निष्कामकामु || २७ ||

जिहीं आत्मबोधाचिया आवडी | केली स्वर्गसंसाराची कुरोंडी |

तेवांचूनि एथींची गोडी | नेणती आणिक || २८ ||

जैसा वायसीं चंद्र नोळखिजे | तैसा प्राकृतीं हा ग्रंथु नेणिजे |

आणि तो हिमांशुचि जेविं खाजें | चकोराचें || २९ ||

तैसा सज्ञानासी तरी हा ठावो | आणि अज्ञानासी आन गांवो |

म्हणौनि बोलावया विषय पहा हो | विशेषु नाहीं || ३० ||

परी अनुवादलों मी प्रसंगें | तें सज्जनीं उपसाहावें लागे |

आतां सांगेन काय श्रीरंगें । निरोपिलें जें ॥ ३१ ॥

तें बुद्धीही आकळितां सांकडें । म्हणौनि बोलीं विपायें सांपडे ।

परी श्रीनिवृत्तिकृपादीप उजियेडें । देखैन मी ॥३२ ॥

जें दिठीही न पविजे । तें दिठीविण देखिजे ।

जरी अतींद्रिय लाहिजे । ज्ञानबळ ॥ ३३ ॥

ना तरी जें धातुवादाही न जोडे । तें लोहींचि पंधरें सांपडे ।

जरी दैवयोगें चढे । परिसु हातां ॥ ३४ ॥

तैसी गुरुकृपा होये । तरी करितां काय आपु नोहे ।

म्हणौनि तें अपार मातें आहे । ज्ञानदेवो म्हणे ॥ ३५ ॥

तेणें कारणें मी बोलेन । बोलीं अरूपाचें रूप दावीन ।

अतींद्रिय परी भोगवीन । इंद्रियांकरवीं ॥ ३६ ॥

आइका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य ।

हे साही गुणवर्य । वसती जेथ ॥ ३७ ॥

म्हणौनि तो भगवंतु । जो निःसंगाचा सांगातु ।

तो म्हणे पार्था दत्तचित्तु । होईं आतां ॥३८ ॥

श्रीभगवानुवाच ।

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।

स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ॥ १ ॥

आइकें योगी आणि संन्यासी जनीं । हे एकचि सिनानें झणीं मानीं ।

एऱ्हवीं विचारिजती जंव दोन्ही । तंव एकचि ते ॥ ३९ ॥

सांडिजे दुजया नामाचा आभासु । तरी योगु तोचि संन्यासु ।

पाहतां ब्रह्मीं नाहीं अवकाशु । दोहींमाजीं ॥ ४० ॥

जैसें नामाचेनि अनारिसेपणें । एका पुरुषातें बोलावणें ।
कां दोहींमार्गीं जाणें । एकाचि ठाया ॥ ४१ ॥
नातरी एकचि उदक सहजें । परि सिनाना घटीं भरिजे ।
तैसें भिन्नत्व जाणिजे । योगसंन्यासांचें ॥ ४२ ॥
आइकें सकळ संमतें जगीं । अर्जुना गा तोचि योगी ।
जो कर्मे करूनि रागी । नोहेचि फळीं ॥ ४३ ॥
जैसी मही हे उद्भिजें । जनी अहंबुद्धीवीण सहजें ।
आणि तेथिंचीं तियें बीजें । अपेक्षीना ॥ ४४ ॥
तैसा अन्वयाचेनि आधारें । जातीचेनि अनुकारें ।
जें जेणें अवसरें । करणें पावे ॥ ४५ ॥
तें तैसेंचि उचित करी । परी साटोपु नोहे शरीरीं ।
आणि बुद्धीही करोनि फळवेरी । जायेचिना ॥ ४६ ॥
ऐसा तोचि संन्यासी । पार्था गा परियेसीं ।
तोचि भरंवसेनिसीं । योगीश्वरु ॥ ४७ ॥
वांचूनि उचित कर्म प्रासंगिक । तयातें म्हणे हे सांडावें बद्धक ।
तरी टांकोटांकीं आणिक । मांडीचि तो ॥ ४८ ॥
जैसा क्षाळूनियां लेपु एकु । सवेंचि लाविजे आणिकु ।
तैसेनि आग्रहाचा पाइकु । विचंबे वायां ॥ ४९ ॥
गृहस्थाश्रमाचें वोझें । कपाळीं आधींचि आहे सहजें ।
कीं तेंचि संन्याससवा ठेविजे । सरिसें पुढती ॥ ५० ॥
म्हणौनि अग्निसेवा न सांडितां । कर्माची रेखा नोलांडितां ।
आहे योगसुख स्वभावता । आपणपांचि ॥ ५१ ॥

**यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पाण्डव ।**

**न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ॥ २ ॥**

ऐकें संन्यासी तोचि योगी । ऐसी एकवाक्यतेची जगीं ।

गुढी उभविली अनेगीं । शास्त्रांतरीं ॥ ५२ ॥

जेथ संन्यासिला संकल्पु तुटे । तेथचि योगाचें सार भेटे ।

ऐसें हें अनुभवाचेनि धटें । साचें जया ॥ ५३ ॥

**आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ।**

**योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥ ३ ॥**

आतां योगाचळाचा निमथा । जरी ठाकावा आथि पार्था ।

तरी सोपाना या कर्मपथा । चुका झणी ॥ ५४ ॥

येणें यमनियमांचेनि तळवटें । रिगे आसनाचिये पाउलवाटें ।

येई प्राणायामाचेनि आडकंठें । वरौता गा ॥ ५५ ॥

मग प्रत्याहाराचा अधाडा । जो बुद्धीचियाही पायां निसरडा ।

जेथ हटिये सांडिती होडा । कडेलग ॥ ५६ ॥

तरी अभ्यासाचेनि बळें । प्रत्याहारीं निराळें ।

नखीं लागेल ढाळें ढाळें । वैराग्याची ॥ ५७ ॥

ऐसा पवनाचेनि पाठारें । येतां धारणेचेनि पैसारें ।

क्रमी ध्यानाचें चवरें । सांपडे तंव ॥ ५८ ॥

मग तया मार्गाची धांव । पुरेल प्रवृत्तीची हांव ।

जेथ साध्यसाधना खेंव । समरसें होय ॥ ५९ ॥

जेथ पुढील पैसु पारुखे । मागील स्मरावें तें ठाके ।

ऐसिये सरिसीये भूमिके । समाधि राहे ॥ ६० ॥

येणें उपायें योगारूढ्ढ । जो निरवधि जाहला प्रौढ्ढ ।

तयाचिया चिन्हांचा निवाडु । सांगैन आइकें ॥ ६१ ॥

यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते ।

सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥ ४ ॥

तरी जयाचिया इंद्रियांचिया घरा । नाहीं विषयांचिया येरझारा ।

जो आत्मबोधाचिया वोवरां । पहुडला असे ॥ ६२ ॥

जयाचें सुखदु:खाचेनि आंगें। झगटलें मानस चेवो नेघे ।

विषय पासींही आलियां से न रिगे । हें काय म्हणौनि ॥ ६३ ॥

इंद्रियें कर्माच्या ठायीं । वाढीनलीं परि कहीं ।

फळहेतूची चाड नाहीं । अंत:करणीं ॥ ६४ ॥

असतेनि देहें एतुला । जो चेतुचि दिसे निदेला ।

तोचि योगारूढ्ढ भला । वोळखें तूं ॥ ६५ ॥

तेथ अर्जुन म्हणे अनंता । हें मज विस्मो बहु आइकतां ।

सांगे तया ऐसी योग्यता । कवणें दीजे ॥ ६६ ॥

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।

आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मन: ॥५ ॥

तंव हांसोनि श्रीकृष्ण म्हणे । तुझें नवल ना हें बोलणें ।

कवणासि काय दिजेल कवणें । अद्वैतीं इये ॥ ६७ ॥

पैं व्यामोहाचिये शेजे । बळिया अविद्या निद्रितु होइजे ।

ते वेळी दु:स्वप्न हा भोगिजे । जन्ममृत्यूंचा ॥६८ ॥

पाठीं अवसांत ये चेवो । तैं तें अवघेंचि होय वावो ।

ऐसा उपजे नित्य सद्भावो । तोहि आपणपांचि ॥ ६९ ॥

म्हणौनि आपणचि आपणयां । घातु कीजतु असे धनंजया ।
चित्त देऊनि नाथिलिया । देहाभिमाना ॥ ७० ॥
बन्धुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥६ ॥
हा विचारूनि अहंकारु सांडिजे । मग असतीचि वस्तु होईजे ।
तरी आपली स्वस्ति सहजें । आपण केली ॥ ७१ ॥
एऱ्हवीं कोशकीटकाचिया परी । तो आपणया आपण वैरी ।
जो आत्मबुद्धि शरीरीं । चारुस्थळीं ॥ ७२ ॥
कैसे प्राप्तीचिये वेळे । निदैवा अंधळेपणाचे डोहळे ।
कीं असते आपुले डोळे । आपण झांकी ॥ ७३ ॥
कां कवण एकु भ्रमलेपणें । मी तो नव्हे गा चोरलों म्हणे ।
ऐसा नाथिला छंदु अंतःकरणें । घेऊनि ठाके ॥ ७४ ॥
एऱ्हवीं होय तें तोचि आहे । परि काई कीजे बुद्धि तैशी नोहे ।
देखा स्वप्नींचेनि घायें । कीं मरे साचें ॥ ७५ ॥
जैशी ते शुकाचेनि आंगभारें । नळिका भोविन्नली एरी मोहरें ।
तेणें उडावें परी न पुरे । मनशंका ॥ ७६ ॥
वायांचि मान पिळी । अटुवें हियें आंवळी ।
टिटांतु नळी । धरूनि ठाके ॥ ७७ ॥
म्हणे बांधला मी फुडा । ऐसिया भावनेचिया पडे खोडां ।
कीं मोकळिया पायांचा चवडा । गोंवी अधिकें ॥ ७८ ॥
ऐसा काजेंवीण आंतुडला । तो सांग पां काय आणिकें बांधिला ।
मग न सोडीच जऱ्ही नेला । तोडूनि अर्धा ॥ ७९ ॥

म्हणौनि आपणयां आपणचि रिपु । जेणें वाढविला हा संकल्पु ।
येर स्वयंबुद्धी म्हणे बापु । जो नाथिलें नेघे ॥ ८० ॥

**जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः ।**
**शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ॥७ ॥**

तया स्वांतःकरणजिता । सकळकामोपशांता ।
परमात्मा परौता । दुरी नाहीं ॥ ८१ ॥
जैसा किडाळाचा दोषु जाये । तरी पंधरें तेंचि होये ।
तैसें जीवा ब्रह्मत्व आहे । संकल्पलोपीं ॥ ८२ ॥
हा घटाकारु जैसा । निमालिया तया अवकाशा ।
नलगे मिळों जाणें आकाशा । आना ठाया ॥ ८३ ॥
तैसा देहाहंकारु नाथिला । हा समूळ जयाचा नाशिला ।
तोचि परमात्मा संचला । आधींचि आहे ॥ ८४ ॥
आतां शीतोष्णाचिया वाहणी । तेथ सुखदुःखाची कडसणीं ।
इयें न समाती कांहीं बोलणीं । मानापमानांचीं ॥ ८५ ॥
जे जिये वाटा सूर्यु जाये । तेउतें तेजाचें विश्व होये ।
तैसें तया पावे तें आहे । तोचि म्हणौनी ॥ ८६ ॥
देखैं मेघौनि सुटती धारा । तिया न रुपती जैसिया सागरा ।
तैशीं शुभाशुभें योगीश्वरा । नव्हती आनें ॥८७ ॥

**ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेन्द्रियः ।**
**युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकांचनः ॥८ ॥**

जो हा विज्ञानात्मकु भावो । तया विवरितां जाहला वावो ।
मग लागला जंव पाहों । तंव ज्ञान तें तोचि ॥ ८८ ॥

आतां व्यापकु कीं एकदेशी। हे ऊहापोही जे ऐसी।

ते करावी ठेली आपैशी। दुजेनवीण ॥८९॥

ऐसा शरीरीचि परी कौतुकें। परब्रह्माचेनि पाडें तुकें।

जेणें जिंतलीं एकें। इंद्रियें गा॥ ९०॥

तो जितेंद्रियु सहजें। तोचि योगयुक्तु म्हणिजे।

जेणे सानें थोर नेणिजे। कवणें काळीं॥ ९१॥

देखैं सोनयाचें निखळ। मेरुयेसणें ढिसाळ।

आणि मातियेचें डिखळ। सरिसेंचि मानी॥ ९२॥

पाहतां पृथ्वीचें मोल थोडें। ऐसें अनर्घ्य रत्न चोखडें।

देखें दगडाचेनि पाडें। निचाडु ऐसा॥ ९३॥

सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबन्धुषु।

साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते॥९॥

तेथ सुहृद आणि शत्रु। कां उदासु आणि मित्रु।

हा भावभेदु विचित्रु। कल्पूं कैंचा॥९४॥

तया बंधु कोण काह्याचा। द्वेषिया कवणु तयाचा।

मीचि विश्व ऐसा जयाचा। बोधु जाहला॥ ९५॥

मग तयाचिये दिठी। अधमोत्तम असे किरीटी ?।

काय परिसाचिये कसवटी। वानिया कीजे ?॥ ९६॥

ते जैशी निर्वाण वर्णुचि करी। तैशी जयाची बुद्धी चराचरीं।

होय साम्याची उजरी। निरंतर॥ ९७॥

जे ते विश्वालंकाराचें विसुरे। जरी आहाती आनानें आकारें।

तरी घडले एकचि भांगारें। परब्रह्में॥ ९८॥

ऐसें जाणणें जें बरवें । तें फावलें तया आघवें ।
म्हणौनि आहाचवाहाच न झकवे । येणें आकारचित्रें ॥ ९९ ॥
घापे पटामाजि दृष्टी । दिसे तंतूंची सैंघ सृष्टी ।
परी तो एकवांचूनि गोठी । दुजी नाहीं ॥ १०० ॥
ऐसेनि प्रतीती हें गवसे । ऐसा अनुभव जयातें असे ।
तोचि समबुद्धि हे अनारिसें । नव्हे जाणें ॥ १०१ ॥
जयाचें नांव तीर्थरावो । दर्शनें प्रशस्तीसि ठावो ।
जयाचेनि संगें ब्रह्मभावो । भ्रांतासही ॥ १०२ ॥
जयाचेनि बोलें धर्मु जिये । दिठी महासिद्धितें विये ।
देखैं स्वर्गसुखादि इयें । खेळु जयाचा ॥ १०३ ॥
विपायें जरी आठवला चित्ता । तरी दे आपुली योग्यता ।
हें असो तयातें प्रशंसितां । लाभु आथि ॥ १०४ ॥
**योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः ।**
**एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ॥ १० ॥**
पुढती अस्तवेना ऐसें । जया पाहलें अद्वैतदिवसें ।
मग आपणपांचि आपणु असे । अखंडित ॥ १०५ ॥
ऐसिया दृष्टी जो विवेकी । पार्था तो एकाकी ।
सहजें अपरिग्रही जो तिहीं लोकीं । तोचि म्हणौनि ॥ १०६ ॥
ऐसियें असाधारणें । निष्पन्नाचीं लक्षणें ।
आपुलेनि बहुवसपणें । श्रीकृष्ण बोले ॥ १०७ ॥
जो ज्ञानियांचा बापु । देखणेयांचे दिठीचा दीपु ।
जया दादुलयाचा संकल्पु । विश्व रची ॥ १०८ ॥

प्रणवाचिये पेठे। जाहलें शब्दब्रह्म माजिठे।
तें जयाचिया यशा धाकुटें। वेढूं न पुरे॥ १०९ ॥
जयाचेनि आंगिकें तेजें। आवो रविशशीचिये वणिजे।
म्हणौनि जग हें वेशजे-। वीण असे तया॥ ११० ॥
हां गा नामचि एक जयाचें। पाहतां गगनही दिसे टांचें।
गुण एकैक काय तयाचे। आकळशील तूं॥ १११ ॥
म्हणौनि असो हें वानणें। सांगों नेणों कवणाचीं लक्षणें।
दावावीं मिषें येणें। कां बोलिलों तें॥ ११२ ॥
ऐकें द्वैताचा ठावोचि फेडी। ते ब्रह्मविद्या कीजेल उघडी।
तरी अर्जुना पढिये हे गोडी। नासेल हन॥ ११३ ॥
म्हणौनि तें तैसे बोलणें। नव्हे सपातळ आड लावणें।
केलें मनचि वेगळवाणें। भोगावया॥ ११४ ॥
जया सोऽहंभाव अटकु। मोक्षसुखालागोनि रंकु।
तयाचिये दिठीचा झणें कळंकु। लागेल तुझिया प्रेमा॥ ११५ ॥
विपाये अहंभावो ययाचा जाईल। मी तेंचि हा जरी होईल।
तरी मग काय कीजेल। एकलेया॥ ११६ ॥
दिठीची पाहतां निविजें। कां तोंड भरोनि बोलिजे।
नातरी दाटूनि खेंव दीजे। ऐसें कवण आहे ?॥ ११७ ॥
आपुलिया मना बरवी। असमाई गोठी जीवीं।
ते कवणेंसि चावळावी। जरी ऐक्य जाहलें॥ ११८ ॥
इया काकुळती जनार्दनें। अन्योपदेशाचेनि हाताशनें।
बोलामाजि मन मनें। आलिंगूं सरलें॥ ११९ ॥

हें परिसतां जरी कानडें । तरी जाण पां पार्थ उघडें ।
कृष्णसुखाचेंचि रूपडें । वोतलें गा ॥ १२० ॥
हें असो वयसेचिये शेवटीं । जैसें एकचि विये वांझोटी ।
मग ते मोहाची त्रिपुटी । नाचों लागे ॥ १२१ ॥
तैसें जाहलें श्रीअनंता । ऐसें तरी मी न म्हणतां ।
जरी तयाचा न देखतां । अतिशयो एथ ॥ १२२ ॥
पाहा पां नवल कैसें चोज । कें उपदेशु केउतें झुंज ।
परी पुढें वालभाचें भोज । नाचत असे ॥ १२३ ॥
आवडी आणि लाजवी । व्यसन आणि शिणवी ।
पिसें आणि न भुलवी । तरी तेंचि काई ? ॥ १२४ ॥
म्हणौनि भावार्थु तो ऐसा । अर्जुन मैत्रियेचा कुवासा ।
कीं सुखें शृंगारलिया मानसा । दर्पणु तो ॥१२५ ॥
यापरी बाप पुण्यपवित्र । जगीं भक्तिबीजासि सुक्षेत्र ।
तो श्रीकृष्णकृपे पात्र । याचिलागीं ॥ १२६ ॥
हो कां आत्मनिवेदनातळींची । जे पीठिका होय सख्याची ।
पार्थु अधिष्ठात्री तेथिंची । मातृका गा ॥१२७ ॥
पासींचि गोसावी न वर्णिजे । मग पाइकाचा गुण घेईजे ।
ऐसा अर्जुनु तो सहजें । पढिये हरी ॥ १२८ ॥
पाहां पां अनुरागें भजें । जे प्रियोत्तमें मानिजे ।
ते पतीहूनि काय न वानिजे । पतिव्रता ? ॥ १२९ ॥
तैसा अर्जुनचिविशेषें स्तवावा । ऐसें आवडलें मज जीवा ।
जे तो त्रिभुवनींचिया दैवां । एकायतनु जाहला ॥ १३० ॥

जयाचिया आवडीचेनि पांगें । अमूर्तुही मूर्ती आवगें ।

पूर्णाहि परी लागे । अवस्था जयाची ॥ १३१ ॥

तंव श्रोते म्हणती दैव । कैसी बोलाची हवाव ।

काय नादातें हन बरव । जिणोनि आली ॥ १३२ ॥

हां हो नवल नोहे देशी । मऱ्हाटी बोलिजे तरी ऐशी ।

वाणें उमटताहे आकाशीं । साहित्य रंगाचे ॥ १३३ ॥

कैसें उन्मेखचांदिणें तार । आणि भावार्थु पडे गार ।

हेचि श्लोकार्थ कुमुदिनी फार । साविया होती ॥ १३४ ॥

चाडचि निचाडां करी । ऐसी मनोरथीं ये थोरी ।

तेणें विवळले अंतरीं । तेथ डोलु आला ॥ १३५ ॥

तें निवृत्तिदासें जाणितलें । मग अवधान द्या म्हणितलें ।

नवल पांडवकुळीं पाहलें । कृष्णदिवसें ॥ १३६ ॥

देवकीया उदरीं वाहिला । यशोदा सायासें पाळिला ।

कीं शेखीं उपेगा गेला । पांडवांसी ॥ १३७ ॥

म्हणौनि बहुदिवस वोळगावा । कां अवसरु पाहोनि विनवावा ।

हाही सोसु तया सदैवा । पडेचिना ॥ १३८ ॥

हें असो कथा सांगें वेगीं । मग अर्जुन म्हणे सलगी ।

देवा इयें संतचिन्हें आंगीं । न ठकती माझ्या ॥ १३९ ॥

एऱ्हवीं या लक्षणांचिया निजसारा । मी अपाडें कीर अपुरा ।

परि तुमचेनि बोलें अवधारा । थोरावें जरी ॥ १४० ॥

जी तुम्ही चित्त देयाल । तरी ब्रह्म मियां होईजेल ।

काय जहालें अभ्यासिजेल । सांगाल जें ॥ १४१ ॥

हां हो नेणों कवणाची काहाणी। आइकोनि श्लाधिजत असों अंतःकरणीं।
ऐसी जहालेपणाची शिरयाणी। कायसी देवा॥ १४२॥
हें आंगें म्यां होईजो का। येतुलें गोसावी आपुलेपणें कीजो कां।
तंव हांसोनि श्रीकृष्ण हो कां। करूं म्हणती॥ १४३॥
देखा संतोषु एक न जोडे। तंवचि सुखाचें सैंघ सांकडें।
मग जोडलिया कवणीकडे। अपुरें असे ?॥ १४४॥
तैसा सर्वेश्वरु बळिया सेवकें। म्हणौनि ब्रह्मही होय तो कौतुकें।
परि कैसा भारें आतला पिकें। दैवाचेनि॥ १४५॥
जो जन्मसहस्रांचियासाठीं। इंद्रादिकांही महागु भेटी।
तो आधीनु केतुला किरीटी। जे बोलुही न साहे॥ १४६॥
मग ऐका जें पांडवें। म्हणितलें म्यां ब्रह्म होआवें।
तें अशेषही देवें। अवधारिलें॥ १४७॥
तेथ ऐसेंचि एक विचारिलें। जे या ब्रह्मत्वाचे डोहळे जाहले।
परि उदरा वैराग्य आहे आलें। बुद्धीचिया॥ १४८॥
एऱ्हवीं दिवस तरी अपुरे। परी वैराग्यवसंताचेनि भरें।
जे सोऽहंभाव महुरे। मोडोनि आला॥ १४९॥
म्हणौनि प्राप्तिफळीं फळतां। यासि वेळु न लगेल आतां।
होय विरक्तु ऐसा अनंता। भरंवसा जाहला॥ १५०॥
म्हणे जें जें हा अधिष्ठील। तें आरंभींच यया फळेल।
म्हणौनि सांगितला न वचेल। अभ्यासु वायां॥ १५१॥
ऐसें विवरोनियां श्रीहरी। म्हणितलें तिये अवसरीं।
अर्जुना हा अवधारीं। पंथराजु॥ १५२॥

तेथ प्रवृत्तितरूच्या बुडीं। दिसती निवृत्तिफळाचिया कोडी।

जिये मार्गीं चा कापडी। महेशु आझुनी ॥१७३॥

पैल योगवृंदे वहिलीं। आडवीं आकाशीं निघालीं।

कीं तेथ अनुभवाच्या पाउलीं। धोरणु पडिला ॥ १७४ ॥

तिहीं आत्मबोधाचेनि उजुकारें। धांव घेतली एकसरें।

कीं येर सकळ मार्ग निदसुरे। सांडूनियां ॥ १७५ ॥

पाठीं महर्षी येणें आले। साधकांचे सिद्ध जाहाले।

आत्मविद थोरावले। येणेंचि पंथें ॥ १७६ ॥

हा मार्गु जैं देखिजे। तैं तहान भूक विसरिजे।

रात्रिदिवसु नेणिजे। वाटे इये ॥ १७७ ॥

चालतां पाऊल जेथ पडे। तेथ अपवर्गाची खाणी उघडे।

आव्हांटलिया तरी जोडे। स्वर्गसुख ॥ १७८ ॥

निगिजे पूर्वीं लिया मोहरा। कीं येइजे पश्चिमेचिया घरा।

निश्चळपणें धनुर्धरा। चालणें एथिंचें ॥ १७९ ॥

येणें मार्गें जया ठाया जाइजे। तो गांवो आपणचि होईजे।

हें सांगों काय सहजें। जाणसी तूं ॥ १६० ॥

तेथ पार्थें म्हणितलें देवा। तरी तेंचि मग केव्हां।

कां आर्तिसमुद्रौनि न काढावा। बुडतु जी मी ॥ १६१ ॥

तंव श्रीकृष्ण म्हणती ऐसें। हें उत्सृंखळ बोलणें कायसें।

आम्हीं सांगतसों आपैसें। वरि पुशिलें तुवां ॥१६२॥

**शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः।**

**नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥ ११ ॥**

तरी विशेषें आतां बोलिजेल । परि तें अनुभवें उपेगा जाईल ।

म्हणौनि तैसें एक लागेल । स्थान पाहावें ॥ १६३ ॥

जेथ अराणुकेचेनि कोडें । बैसलिया उठों नावडे ।

वैराग्यासी दुणीव चढे । देखिलिया जें ॥ १६४ ॥

जो संतीं वसविला ठावो । संतोषासि सावावो ।

मना होय उत्सावो । धैर्याचा ॥ १६५ ॥

अभ्यासुचि आपणयातें करी । हृदयातें अनुभवु वरी ।

ऐसी रम्यपणाची थोरी । अखंड जेथ ॥ १६६ ॥

जया आड जातां पार्था । तपश्चर्या मनोरथा ।

पाखांडियाही आस्था । समूळ होय ॥ १६७ ॥

स्वभावें वाटे येतां । जरी वरपडा जाहला अवचितां ।

तरी सकामुही परि माघौता । निघों विसरे ॥ १६८ ॥

ऐसेनि न राहतयातें राहावी । भ्रमतयातें बैसवी ।

थापटूनि चेववी । विरक्तीतें ॥ १६९ ॥

हें राज्य वर सांडिजे । मग निवांता एथेंचि असिजे ।

ऐसें श्रृंगारियांहि उपजे । देखतखेंवो ॥ १७० ॥

जें येणें मानें बरवंट । आणि तैसेंचि अतिचोखट ।

जेथ अधिष्ठान प्रगट । डोळां दिसे ॥ १७१ ॥

आणिकही एक पहावें । जें साधकीं वसतें होआवें ।

आणि जनाचेनि पायरवें । रुळेचिना ॥ १७२ ॥

जेथ अमृताचेनि पाडें । मुळाहीसकट गोडें ।

जोडती दाटें झाडें । सदा फळतीं ॥ १७३ ॥

पाउला पाउला उदकें । वर्षाकाळेंही अतिचोखें ।
निर्झरें का विशेखें । सुलभें जेथ ॥ १७४ ॥
हा आतपुही आळुमाळु । जाणिजे तरी शीतळु ।
पवनु अति निश्चळु । मंदु झुळके ॥ १७५ ॥
बहुत करूनि निःशब्द । दाट न रिगे श्वापद ।
शुक हन षट्पद । तेउतें नाहीं ॥ १७६ ॥
पाणिलगें हंसें । दोनी चारी सारसें ।
कवणे एके वेळे बैसे । तरी कोकिळही हो ॥ १७७ ॥
निरंतर नाहीं । तरी आलीं गेलीं कांहीं ।
होतु कां मयूरेंही । आम्ही ना न म्हणों ॥ १७८ ॥
परि आवश्यक पांडवा । ऐसा ठावो जोडावा ।
तेथ निगूढ मठ होआवा । कां शिवालय ॥ १७९ ॥
दोहींमाजीं आवडे तें । जें मानलें होय चित्तें ।
बहुतकरूनि एकांते । बैसिजे गा ॥ १८० ॥
म्हणौनि तैसें तें जाणावें । मन राहतें पाहावें ।
राहील तेथ रचावें । आसन ऐसें ॥ १८१ ॥
वरी चोखट मृगसेवडी । माजीं धूतवस्त्राची घडी ।
तळवटीं अमोडी । कुशांकुर ॥ १८२ ॥
सकोमळ सरिसे । सुबद्ध राहती आपैसे ।
एकपाडें तैसें । वोजा घालीं ॥ १८३ ॥
परि सावियाचि उंच होईल । तरी आंग हन डोलेल ।
नीच तरी पावेल । भूमिदोषु ॥ १८४ ॥

म्हणौनि तैसें न करावें । समभावें धरावें ।

हें बहु असो होआवें । आसन ऐसें ॥ १८५ ॥

**तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः ।**

**उपविश्यासने युञ्ज्याद् योगं आत्मविशुद्धये ॥ १२ ॥**

मग तेथ आपण । एकाग्र अंतःकरण ।

करूनि सद्गुरुस्मरण । अनुभविजे ॥ १८६ ॥

जेथ स्मरतेनि आदरें । सबाह्य सात्त्विकें भरे ।

जंव काठिण्य विरे । अहंभावाचें ॥ १८७ ॥

विषयांचा विसरु पडे । इंद्रियांची कसमस मोडे ।

मनाची घडी घडे । हृदयामाजीं ॥ १८८ ॥

ऐसें ऐक्य हें सहजें । फावें तंव राहिजे ।

मग तेणेंचि बोधें बैसिजे । आसनावरी ॥ १८९ ॥

आतां आंगातें आंग वरी । पवनातें पवनु धरी ।

ऐसी अनुभवाची उजरी । होंचि लागे ॥ १९० ॥

प्रवृत्ति माघौति मोहरे । समाधि ऐलाडी उतरे ।

आघवें अभ्यासु सरे । बैसतखेंवो ॥ १९१ ॥

मुद्रेची प्रौढी ऐशी । तेचि सांगिजेल आतां परियेसीं ।

तरी उरु या जघनासी । जडोनि घालीं ॥ १९२ ॥

चरणतळें देव्हडीं । आधारद्रुमाच्या बुडीं ।

सुघटितें गाढीं । संचरीं पां ॥ १९३ ॥

सव्य तो तळीं ठेविजे । तेणें सिवणीमध्यें पीडिजे ।

वरी बैसे तो सहजें । वाम चरणु ॥ १९४ ॥

गुद मेंढ्राआंतौतीं । चारी अंगुळें निगुतीं ।

तेथ सार्ध सार्ध प्रांतीं । सांडूनियां ॥ १९५ ॥

माजी अंगुळ एक निगे । तेथ टांचेचेनि उत्तरभागें ।

नेहेटिजे वरि आंगें । पेललेनि ॥ १९६ ॥

उचलिलें कां नेणिजे । तैसें पृ ष्ठांत उचलिजे ।

गुल्फद्वय धरिजे । तेणेंचि मानें ॥ १९७ ॥

मग शरीर संचु पार्था । अशेषही सर्वथा ।

पार्ष्णीचा माथा । स्वयंभु होय ॥ १९८ ॥

अर्जुना हें जाण । मूळबंधाचें लक्षण ।

वज्रासन गौण । नाम यासी ॥ १९९ ॥

ऐसी आधारीं मुद्रा पडे । आणि आधींचा मार्गु मोडे ।

तेथ अपानु आंतुलेकडे । वोहोटों लागे ॥ २०० ॥

**समं कायशिरोग्रीवं धारयन् अचलं स्थिरः ।**

**संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चान् अवलोकयन् ॥ १३ ॥**

तंव करसंपुट आपैसें । वाम चरणीं बैसे ।

तंव बाहुमूळीं दिसे । थोरीव आली ॥ २०१ ॥

माजीं उभारलेनि दंडें । शिरकमळ होय गाढें ।

नेत्रद्वारींचीं कवाडें । लागूं पाहती ॥ २०२ ॥

वरचिलें पातीं ढळतीं । तळींचीं तळीं पुंजाळती ।

तेथ अर्धोन्मीलित स्थिती । उपजे तया ॥ २०३ ॥

दिठी राहोनि आंतुलीकडे । बाहेर पाऊल घाली कोडें ।

ते ठायीं ठावो पडे । नासाग्रपीठीं ॥ २०४ ॥

ऐसें आंतुच्या आंतुचि रचे । बाहेरी मागुतें न वचे ।

म्हणौनि राहणें आधिये दिठीचें । तेथेंचि होय ॥ २०५ ॥

आतां दिशांची भेटी घ्यावी । कां रूपाची वास पहावी ।

हे चाड सरे आघवी । आपैसया ॥ २०६ ॥

मग कंठनाळ आटे । हनुवटी हडौती दाटे ।

ते गाढी होऊनि नेहटे । वक्षःस्थळीं ॥ २०७ ॥

माजीं घंटिका लोपे । वरी बंधु जो आरोपे ।

तो जालंधरु म्हणिपे । पंडुकुमरा ॥ २०८ ॥

नाभीवरी पोखे । उदर हें थोके ।

अंतरीं फांके । हृदयकोशु ॥ २०९ ॥

स्वाधिष्ठानावरिचिले कांठीं । नाभिस्थानातळवटीं ।

बंधु पडे किरीटी । वोढियाणा तो ॥ २१० ॥

**प्रशांतात्मा विगतभीः ब्रह्मचारिव्रते स्थितः ।**

**मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥ १४ ॥**

ऐसी शरीराबाहेरलीकडे । अभ्यासाची पांखर पडे ।

तंव आंतु त्राय मोडे । मनोधर्मांची ॥ २११ ॥

कल्पना निमे । प्रवृत्ती शमे ।

आंग मन विरमे । सावियाचि ॥ २१२ ॥

क्षुधा काय जाहाली । निद्रा केउती गेली ।

हे आठवणही हारपली । न दिसे वेगां ॥ २१३ ॥

जो मूळबंधें कोंडला । अपानु माघौता मुरडला ।

तो सवेंचि वरी सांकडला । धरी फुगूं ॥ २१४ ॥

क्षोभलेपणें माजे । उवाइला ठायीं गाजे ।

मणिपूरेंसीं झुंजे । राहोनियां ॥ २१५ ॥

मग थावलिये वाहटुळी । सैंघ घेऊनि घर डहुळी ।

बाळपणींची कुहीटुळी । बाहेर घाली ॥ २१६ ॥

भीतरीं वळी न धरे । कोठ्यामाजीं संचरे ।

कफपित्तांचे थारे । उरों नेदी ॥ २१७ ॥

धातूंचे समुद्र उलंडी । मेदाचे पर्वत फोडी ।

आंतली मज्जा काढी । अस्थिगत ॥ २१८ ॥

नाडीतें सोडवी । गात्रांतें विघडवी ।

साधकातें भेडसावी । परी बिहावें ना ॥ २१९ ॥

व्याधीतें दावी । सवेंचि हरवी ।

आप पृथ्वी कालवी । एकवाट ॥ २२० ॥

तंव येरीकडे धनुर्धरा । आसनाचा उबारा ।

शक्ति करी उजगरा । कुंडलिनीतें ॥ २२१ ॥

नागिणीचें पिलें । कुंकुमें नाहलें ।

वळण घेऊनि आलें । सेजे जैसें ॥ २२२ ॥

तैशी ते कुंडलिनी । मोटकी औट वळणी ।

अधोमुख सर्पिणी । निदेली असे ॥ २२३ ॥

विद्युल्लतेची विडी । वन्हिज्वाळांची घडी ।

पंधरेयाची चोखडी । घोंटीव जैशी ॥ २२४ ॥

तैशी सुबद्ध आटली । पुटीं होती दाटली ।

तें वज्रासनें चिमुटली । सावधु होय ॥ २२५ ॥

तेथ नक्षत्र जैसें उलंडलें । कीं सूर्याचें आसन मोडलें ।

तेजाचें बीज विरूढलें । अंकुरेंशीं ॥ २२६ ॥

तैशी वेढियातें सोडिती । कवतिकें आंग मोडिती ।

कंदावरी शक्ती । उठली दिसे ॥ २२७ ॥

सहजें बहुतां दिवसांची भूक । वरी चेवविली तें होय मिष ।

मग आवेशें पसरी मुख । ऊर्ध्वा उजू ॥ २२८ ॥

तेथ हृदयकोशातळवटीं । जो पवनु भरे किरीटी ।

तया सगळेयाचि मिठी । देऊनि घाली ॥ २२९ ॥

मुखींच्या ज्वाळीं । तळीं वरी कवळी ।

मांसाची वडवाळी । आरोगूं लागे ॥ २३० ॥

जे जे ठाय समांस । तेथ आहाच जोडे घाउस ।

पाठी एकदोनी घांस । हियाही भरी ॥ २३१ ॥

मग तळवे तळहात शोधी । उर्ध्वीं चे खंड भेदी ।

झाडा घे संधी । प्रत्यंगाचा ॥ २३२ ॥

अधोभाग तरी न संडी । परि नखींचेंही सत्त्व काढी ।

त्वचा धुवूनि जडी । पांजरेंशीं ॥ २३३ ॥

अस्थींचे नळे निरपे । शिरांचे हीर वोरपे ।

तंव बाहेरी विरूढी करपे । रोमबीजांची ॥ २३४ ॥

मग सप्तधातूंच्या सागरीं । ताहानेली घोंट भरी ।

आणि सर्वेंचि उन्हाळा करी । खडखडीत ॥ २३५ ॥

नासापुटौनि वारा । जो जातसे अंगुळें बारा ।

तो गच्चू धरूनि माघारा । आंतु घाली ॥ २३६ ॥

तेथ अध वरौतें आकुंचे । ऊर्ध्व तळौतें खांचे ।

तया खेंवामाजि चक्राचे । पदर उरती ॥ २३७ ॥

एऱ्हवीं तरी दोन्ही तेव्हांचि मिळती । परी कुंडलिनी नावेक दुश्चित्त होती ।

ते तयांतें म्हणे परौती । तुम्हीचि कायसी एथें ? ॥ २३८ ॥

आइकें पार्थिव धातु आघवी । आरोगितां कांहीं नुरवी ।

आणि आपातें तंव ठेवी । पुसोनियां ॥ २३९ ॥

ऐसी दोनी भूतें खाये । ते वेळीं संपूर्ण धाये ।

मग सौम्य होउनि राहे । सुषुम्नेपाशीं ॥ २४० ॥

तेथ तृप्तीचेनि संतोषें । गरळ जें वमी मुखें ।

तेणें तियेचेनि पीयूषें । प्राणु जिये ॥ २४१ ॥

तो अग्नि आंतूनि निघे । परी सबाह्य निववूंचि लागे ।

ते वेळीं कसु बांधिती आंगें । सांडिला पुढती ॥ २४२ ॥

मार्ग मोडिती नाडीचे । नवविधपण वायूचें ।

जाय म्हणौनि शरीराचे । धर्मु नाहीं ॥ २४३ ॥

इडा पिंगळा एकवटती । गांठी तिन्ही सुटती ।

साही पदर फुटती । चक्रांचे हे ॥ २४४ ॥

मग शशी आणि भानु । ऐसा कल्पिजे जो अनुमानु ।

तो वातीवरी पवनु । गिंवसितां न दिसे ॥ २४५ ॥

बुद्धीची पुळिका विरे । परिमळु घ्राणीं उरे ।

तोही शक्तीसवें संचरे । मध्यमेमाजीं ॥ २४६ ॥

तंव वरिलेकडोनि ढाळें । चंद्रामृताचें तळें ।

कानवडोनी मिळे । शक्तिमुखीं ॥ २४७ ॥

तेणें नाळकें रस भरे । तो सर्वांगामाजीं संचरे ।

जेथिंचा तेथ मुरे । प्राणपवनु ॥ २४८ ॥

तातलिये मुसें । मेण निघोनि जाय जैसें ।

मग कोंदली राहे रसें । वोतलेनी ॥ २४९ ॥

तैसें पिंडाचेनि आकारें । ते कळाचि कां अवतरे ।

वरी त्वचेचेनि पदरें । पांघुरली असे ॥ २५० ॥

जैशी आभाळाची बुंथी । करूनि राहे गभस्ती ।

मग फिटलिया दीप्ति । धरूनि ये ॥ २५१ ॥

तैसा आहाचवरि कोरडा । त्वचेचा असे पातोडा ।

तो झडोनि जाय कोंडा । जैसा होय ॥ २५२ ॥

मग काश्मीरीचे स्वयंभ । कां रत्न बीजा निघाले कोंभ ।

अवयवकांतीची भांब । तैसी दिसे ॥ २५३ ॥

नातरी संध्यारागींचे रंग । काढूनि वळिलें तें आंग ।

कीं अंतर्ज्योतीचें लिंग । निर्वाळिलें ॥ २५४ ॥

कुंकुमाचें भरींव । सिद्धरसाचें वोतींव ।

मज पाहतां सावेव । शांतिचि ते ॥ २५५ ॥

तें आनंदचित्रींचें लेप । नातरी महासुखाचें रूप ।

कीं संतोषतरूचें रोप । थांबलें जैसें ॥ २५६ ॥

तो कनकचंपकाचा कळा । कीं अमृताचा पुतळा ।

नाना सासिन्नला मळा । कोंवळिकेचा ॥ २५७ ॥

हो कां जे शारदियेचेनि वोलें । चंद्रबिंब पाल्हेलें ।

कां तेजचि मूर्त बैसलें । आसनावरी ॥ २५८ ॥

तैसें शरीर होये। जे वेळीं कुंडलिनी चंद्र पीये।

मग देहाकृति बिहे। कृतांतु गा॥ २५९ ॥

वार्धक्य तरी बहुडे। तारुण्याची गांठी विघडे।

लोपली उघडे। बाळदशा॥ २६० ॥

वयसा तरी येतुलेवरी। ऎऱ्हवीं बळाचा बळार्थु करी।

धैर्याची थोरी। निरुपमु॥ २६१ ॥

कनकद्रुमाच्या पालवीं। रत्नयकळिका नित्य नवी।

नखें तैसीं बरवीं। नवीं निघती॥ २६२ ॥

दांतही आन होती। परि अपाडें सानेजती।

जैसी दुबाहीं बैसे पांती। हिरेयांची॥२६३ ॥

माणिकुलियांचिया कणिया। सावियाचि अणुमानिया।

तैसिया सर्वांगीं उधवती अणियां। रोमांचियां॥ २६४ ॥

करचरणतळें। जैसीं कां रातोत्पलें।

पाखाळींव होती डोळे। काय सांगों॥ २६५ ॥

निडाराचेनि कोंदाटें। मोतियें नावरती संपुटें।

मग शिवणी जैशी उतटे। शुक्तिपल्लवांची॥२६६ ॥

तैशीं पातियांचिये कवळिये न समाये। दिठी जाकळोनि निघों पाहे।

आधिलीचि परी होये। गगना कवळिती॥ २६७ ॥

आइके देह होय सोनियाचें। परि लाघव ये वायूचें।

जे आप आणि पृथ्वीचे। अंशु नाहीं॥२६८ ॥

मग समुद्रापैलीकडील देखे। स्वर्गींचा आलोचु आइके।

मनोगत वोळखे। मुंगियेचें॥ २६९ ॥

पवनाचा वारिकां वळघे । चाले तरी उदकीं पाऊल न लागे ।
येणें येणें प्रसंगें । येती बहुता सिद्धि ॥ २७० ॥
आइकें प्राणाचा हातु धरूनी । गगनाची पाउटी करूनी ।
मध्यमेचेनि दादराहुनी । हृदया आली ॥ २७१ ॥
ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा ।
जया विश्वबीजाचिया कोंभा । साउली केली ॥ २७२ ॥
जे शून्यलिंगाची पिंडी । जे परमात्मया शिवाची करंडी ।
जे प्रणवाची उघडी । जन्मभूमी ॥ २७३ ॥
हें असो ते कुंडलिनी बाळी । हृदयाआंतु आली ।
अनुहताची बोली । चावळे ते ॥ २७४ ॥
शक्तीचिया आंगा लागलें । बुद्धीचें चैतन्य होतें जाहलें ।
तें तेणें आइकिलें । अळुमाळु ॥ २७५ ॥
घोषाच्या कुंडीं । नादचित्रांचीं रूपडीं ।
प्रणवाचिया मोडी । रेखिलीं ऐसीं ॥ २७६ ॥
हेंचि कल्पावें तरी जाणिजे । परी कल्पितें कैचें आणिजे ।
तरी नेणों काय गाजे । तिये ठायीं ॥ २७७ ॥
विसरोनि गेलों अर्जुना । जंव नाशु नाहीं पवना ।
तंव वाचा आथी गगना । म्हणौनि घुमे ॥ २७८ ॥
तया अनाहताचेनि मेघें । आकाश दुमदुमों लागे ।
तंव ब्रह्मस्थानींचें बेगें । सहज फिटे ॥ २७९ ॥
आइकें कमळगर्भाकारें । जें महदाकाश दुसरें ।
जेथ चैतन्य आधातुरें । करूनि असिजे ॥ २८० ॥

तया ह्रदयाच्च्या परिवरीं । कुंडलिनिया परमेश्वरी ।

तेजाची शिदोरी । विनियोगिली ॥ २८१ ॥

बु्द्धीचेनि शाकें । हातबोनें निकें ।

द्वैत तेथ न देखे । तैसें केलें ॥२८२ ॥

निजकांती हारविली । मग प्राणुचि केवळ जाहाली ।

ते वेळीं कैसी गमली । म्हणावी पां ? ॥ २८३ ॥

हो कां जे पवनाची पुतळी । पांघुरली होती सोनसळी ।

ते फेडूनियां वेगळी । ठेविली तिया ॥ २८४ ॥

नातरी वायूचेनि आंगें झगटली । दीपाची दिठी निवटली ।

कां लखलखोनि हारपली । वीजु गगनीं ॥ २८५ ॥

तैशी ह्रदयकमळवेर्‍ही । दिसे जैशी सोनियाची सरी ।

नातरी प्रकाशजळाची झरी । वाहत आली ॥ २८६ ॥

मग ते ह्रदयभूमी पोकळे । जिराली कां एके वेळे ।

तैसें शक्तिचें रूप मावळे । शक्तिचिमाजीं ॥ २८७ ॥

तेव्हां तरी शक्तिचि म्हणिजे । एर्‍हवीं तो प्राणु केवळ जाणिजे ।

आतां नादुबिंदु नेणिजे । कळा ज्योती ॥२८८ ॥

मनाचा हन मारु । कां पवनाचा आधारु ।

ध्यानाचा आदरु । नाहीं परी ॥ २८९ ॥

हे कल्पना घे सांडी । तें नाहीं इये परवडी ।

हे महाभूतांची फुडी । आटणी देखां ॥ २९० ॥

पिंडें पिंडाचा ग्रासु । तो हा नाथसंकेतींचा दंशु ।

परि दाऊनि गेला उद्देशु । श्रीमहाविष्णु ॥ २९१ ॥

तया ध्वनिताचें केणें सोडुनि । यथार्थाची घडी झाडुनी ।

उपलविली म्यां जाणुनी । ग्राहीक श्रोते ॥ २९२ ॥

युञ्जन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः ।

शान्ति निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥ १५ ॥

ऐकें शक्तीचें तेज जेव्हां लोपे । तेथ देहाचें रूप हारपे ।

मग तो डोळ्यांमाजीं लपे । जगाचिया ॥ २९३ ॥

एऱ्हवीं आधिलाचि ऐसें । सावयव तरी दिसे ।

परी वायूचें कां जैसें । वळिलें होय ॥२९४ ॥

नातरी कर्दळीचा गाभा । बुंथी सांडोनी उभा ।

कां अवयवचि नभा । उदयला तो ॥ २९५ ॥

तैसें होय शरीर । तैं तें म्हणिजे खेचर ।

हें पद होतां चमत्कार । पिंडजनीं ॥ २९६ ॥

देखें साधकु निघोनि जाये । मागां पाउलांची वोळ राहे ।

तेथ ठायीं ठायीं होये । अणिमादिक ॥ २९७ ॥

परि तेणें काय काज आपणयां । अवधारीं ऐसा धनंजया ।

लोप आथी भूतत्रया । देहींचा देहीं ॥ २९८ ॥

पृथ्वीतें आप विरवी । आपातें तेज जिरवी ।

तेजातें पवनु हरवी । हृदयामाजीं ॥ २९९ ॥

पाठीं आपण एकला उरे । परि शरीराचेनि अनुकारें ।

मग तोही निगे अंतरें । गगना मिळे ॥ ३०० ॥

ते वेळीं कुंडलिनी हे भाष जाये । मग मारुत ऐसें नाम होये ।

परि शक्तिपण तें आहे । जंव न मिळे शिवीं ॥ ३०१ ॥

मग जालंधर सांडी | ककारांत फोडी |
गगनाचिये पाहाडीं | पैठी होय || ३०२ ||

ते ॐ काराचिये पाठी | पाय देत उठाउठी |
पश्यंतीचिये पाउटी | मागां घाली || ३०३ ||

पुढां तन्मात्रा अर्धवेरी | आकाशाच्या अंतरीं |
भरती गमे सागरीं | सरिता जेवीं || ३०४ ||

मग ब्रह्मरंध्रीं स्थिरावोनी | सोऽहंभावाच्या बाह्या पसरुनी |
परमात्मलिंगा धांवोनी | आंगा घडे || ३०५ ||

तंव महाभूतांची जवनिका फिटे | मग दोहींसि होय झटें |
तेथ गगनासकट आटे | समरसीं तिये || ३०६ ||

पैं मेघाचेनि मुखीं निवडिला | समुद्र कां वोघीं पडिला |
तो मागुता जैसा आला | आपणपयां || ३०७ ||

तेवीं पिंडाचेनि मिषें | पदीं पद प्रवेशे |
तें एकत्व होय तैसें | पंडुकुमरा || ३०८ ||

आतां दुजें हन होतें | कीं एकचि हें आइतें |
ऐशिये विवंचनेपुरतें | उरेचिना || ३०९ ||

गगनीं गगन लया जाये | ऐसें जें कांहीं आहे |
तें अनुभवें जो होये | तो होऊनि ठाके || ३१० ||

म्हणौनि तेथिंची मातु | न चढेचि बोलाचा हातु |
जेणें संवादाचिया गांवाआंतु | पैठी कीजे || ३११ ||

अर्जुना एऱ्हवीं तरी | इया अभिप्रायाचा जे गर्व धरी |
ते पाहें पां वैखरी | दुरी ठेली || ३१२ ||

भ्रूलता मागिलीकडे । तेथ मकाराचेंचि आंग न मांडे ।
सडेया प्राणा सांकडें । गगना येतां ॥ ३१३ ॥
पाठीं तेथेंचि तो भेसळला । तैं शब्दाचा दिवो मावळला ।
मग तयाहि वरी आटु भविन्नला । आकाशाचा ॥ ३१४ ॥
आतां महाशून्याचिया डोहीं । जेथ गगनसीचि थावो नाहीं ।
तेथ तागा लागेल काई । बोलाचा इया ? ॥ ३१५ ॥
म्हणौनि आखरामाजीं सांपडे । कीं कानवरी जोडे ।
हे तैसें नव्हे फुडें । त्रिशुद्धी गा ॥ ३१६ ॥
जें कहीं दैवें । अनुभविलें फावे ।
तैं आपणचि हें ठाकावें । होऊनियां ॥ ३१७ ॥
पुढती जाणणें तें नाहींचि । म्हणौनि असो किती हेंचि ।
बोलावें आतां वायांचि । धनुर्धरा ॥ ३१८ ॥
ऐसें शब्दजात माघौतें सरे । तेथ संकल्पाचें आयुष्य पुरे ।
वाराही जेथ न शिरे । विचाराचा ॥ ३१९ ॥
जें उन्मनियेचें लावण्य । जें तुर्येचें तारुण्य ।
अनादि जें अगण्य । परमतत्त्व ॥ ३२० ॥
जें विश्वाचें मूळ । जें योगद्रुमाचें फळ ।
जें आनंदाचें केवळ । चैतन्य गा ॥ ३२१ ॥
जें आकाराचा प्रांतु । जें मोक्षाचा एकांतु ।
जेथ आदि आणि अंतु । विरोनी गेले ॥ ३२२ ॥
जें महाभूतांचें बीज । जें महातेजाचें तेज ।
एवं पार्था जें निज- । स्वरूप माझें ॥ ३२३ ॥

ते हे चतुर्भुज कोंभेली । जयाची शोभा रूपा आली ।

देखोनि नास्तिकीं नोकिलीं । भक्तवृंदें ॥३२४ ॥

तें अनिर्वाच्य महासुख । पैं आपणचि जाहले जे पुरुष ।

जयांचे कां निष्कर्ष । प्राप्तिवेरीं ॥ ३२५ ॥

आम्हीं साधन हें जें सांगितलें । तेंचि शरीरीं जिहीं केलें ।

ते आमुचेनि पाडें आले । निर्वाळलेया ॥ ३२६ ॥

परब्रह्माचेनि रसें । देहाकृतीचिये मुसें ।

वोतींव जाहले तैसे । दिसती आंगें ॥ ३२७ ॥

जरी हे प्रतीति हन अंतरीं फांके । तरी विश्वचि हें अवघें झांके ।

तंव अर्जुन म्हणे निकें । साचचि जी हें ॥ ३२८ ॥

कां जें आपण आतां देवो । हा बोलिले जो उपावो ।

तो प्राप्तीचा ठावो । म्हणोनि घडे ॥ ३२९ ॥

इये अभ्यासीं जे दृढ होती । ते भरंवसेनि ब्रह्मत्वा येती ।

हें सांगतियाची रीती । कळलें मज ॥ ३३० ॥

देवा गोठीचि हे ऐकतां । बोधु उपजतसे चित्ता ।

मा अनुभवें तल्लीनता । नोहेल केवीं ? ॥ ३३१ ॥

म्हणौनि एथ कांहीं । अनारिसें नाहीं ।

परी नावभरी चित्त देईं । बोला एका ॥३३२ ॥

आतां कृष्णा तुवां सांगितला योगु । तो मना तरी आला चांगु ।

परि न शकें करूं पांगु । योग्यतेचा ॥ ३३३ ॥

सहजें आंगिक जेतुलें आहे । तेतुलियाची जरी सिद्धि जाये ।

तरी हाचि मार्गु सुखोपायें । अभ्यासीन ॥३३४ ॥

नातरी देवो जैसें सांगतील । तैसें आपणपें जरी न ठकेल ।
तरी योग्यतेवीण होईल । तेंचि पुसों ॥ ३३५ ॥
जीवींचिये ऐसी धारण । म्हणोनि पुसावया जाहलें कारण ।
मग म्हणे तरी आपण । चित्त देइजो ॥ ३३६ ॥
हां हो जी अवधारिलें । जें हें साधन तुम्हीं निरूपिलें ।
तें आवडतयाहि अभ्यासिलें । फावों शके ? ॥ ३३७ ॥
कीं योग्यतेवीण नाहीं । ऐसें हन आहे कांहीं ।
तेथ श्रीकृष्ण म्हणती काई । धनुर्धरा ॥ ३३८ ॥
हें काज कीर निर्वाण । परि आणिकही जें कांहीं साधारण ।
तेंही अधिकाराचे वोडवेविण । काय सिद्धि जाय ? ॥ ३३९ ॥
पैं योग्यता जे म्हणिजे । ते प्राप्तीची अधीन जाणिजे ।
कां जे योग्य होऊनि कीजे । तें आरंभिलें फळें ॥ ३४० ॥
तरी तैसी एथ कांहीं । साविियाचि केणी नाहीं ।
आणि योग्यतेची काई । खाणी असे ? ॥ ३४१ ॥
नावेक विरक्तु । जाहला देहधर्मी नियतु ।
तरि तोचि नव्हे व्यवस्थितु । अधिकारिया ? ॥ ३४२ ॥
येतुलालिये आयणीमाजिवडें । योग्यपण तूतेंही जोडे ।
ऐसें प्रसंगें सांकडें । फेडिलें तयाचें ॥ ३४३ ॥
मग म्हणे पार्था । ते हे ऐसी व्यवस्था ।
अनियतासि सर्वथा । योग्यता नाहीं ॥ ३४४ ॥
**नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः ।**
**न चाति स्वप्न शीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥ १६ ॥**

जो रसनेंद्रियाचा अंकिला । कां निद्रेसी जीवें विकला ।
तो नाहींच एथ म्हणितला । अधिकारिया ॥ ३४५ ॥
अथवा आग्रहाचिये बांदोडी । क्षुधा तृषा कोंडी ।
आहारातें तोडी । मारूनियां ॥ ३४६ ॥
निद्रेचिया वाटा नवचे । ऐसा दृढिवेचेनि अवतरणें नाचे ।
तें शरीरचि नव्हे तयाचें । मा योगु कवणाचा ? ॥ ३४७ ॥
म्हणौनि अतिशयें विषयो सेवावा । तैसा विरोधु नोहावा ।
कां सर्वथा निरोधावा । हेंही नको ॥ ३४८ ॥

**युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।**
**युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दु:खहा ॥ १७ ॥**

आहार तरी सेविजे । परी युक्तीचेनि मापें मविजे ।
क्रियाजात आचरिजे । तयाचि स्थिती ॥ ३४९ ॥
मितला बोलीं बोलिजे । मितलिया पाउलीं चालिजे ।
निद्रेही मानु दीजे । अवसरें एकें ॥ ३५० ॥
जागणें जरी जाहलें । तरी होआवें तें मितलें ।
येतुलेनि धातुसाम्य संचलें । असेल सहजें ॥ ३५१ ॥
ऐसें युक्तीचेनि हातें । जें इंद्रियां वोपिजे भातें ।
तैं संतोषासी वाढतें । मनचि करी ॥ ३५२ ॥

**यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते ।**
**नि:स्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥१८ ॥**

बाहेर युक्तीची मुद्रा पडे । तव आंत आंत सुख वाढे ।
तेथें सहजेंचि योगु घडे । नाभ्यासितां ॥ ३५३ ॥

जैसें भाग्याचिया भडसें । उद्यमाचेनि मिसें ।
मग समृद्धिजात आपैसें । घर रिघे ॥३७४ ॥
तैसा युक्तिमंतु कौतुकें । अभ्यासाचिया मोहरा ठाके ।
आणि आत्मसिद्धीचि पिके । अनुभवु तयाचा ॥ ३७५ ॥
म्हणोनि युक्ति हे पांडवा । घडे जया सदैवा ।
तो अपवर्गीचिये राणिवा । अळंकारिजे ॥ ३७६ ॥

**यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता ।**
**योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः ॥ १९ ॥**

युक्ति योगाचें आंग पावे । ऐसें प्रयाग जेथ होय बरवें ।
तेथ क्षेत्रसंन्यासें स्थिरावें । मानस जयाचें ॥ ३७७ ॥
तयातें योगयुक्त तूं म्हण । हेंही प्रसंगें जाण ।
तें दीपाचे उपलक्षण । निर्वातींचिया ॥ ३७८ ॥
आतां तुझें मनोगत जाणोनी । कांहीं एक आम्ही म्हणौनि ।
तें निकें चित्त देउनी । परिसावें गा ॥ ३७९ ॥
तूं प्राप्तीची चाड वाहसी । परी अभ्यासीं दक्षु नव्हसी।
तें सांग पां काय बिहसी । दुवाडपणा ? ॥ ३८० ॥
तरी पार्था हें झणें । सायास घेशीं हो मनें ।
वायां बागूल इये दुर्जनें । इंद्रियें करिती ॥३८१ ॥
पाहें पां आयुष्यातें अढळ करी । जें सरतें जीवित वारी ।
तया औषधातें वैरी । काय जिव्हा न म्हणे ? ॥ ३८२ ॥
ऐसें हितासि जें जें निकें । तें सदाचि या इंद्रियां दुःखें ।
एऱ्हवीं सोपें योगासारिखें । कांहीं आहे ? ॥ ३८३ ॥

**यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।**

**यत्र चैवात्मनात्मानं पश्यन् आत्मनि तुष्यति ॥ २० ॥**

**सुखमात्यन्तिकं यत्तत् बुद्धिग्राह्यमतीन्द्रियम् ।**

**वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥ २१ ॥**

म्हणौनि आसनाचिया गाढिका ।

जो आम्हीं अभ्यासु सांगितला निका ।

तेणें होईल तरी हो कां । निरोधु यया ॥ ३६४ ॥

एऱ्हवीं तरी येणें योगें । जैं इंद्रियां विंदाण लागे ।

तैं चित्त भेटों रिगे । आपणपेयां ॥ ३६५ ॥

परतोनि पाठिमोरें ठाके । आणि आपणियांतें आपण देखे ।

देखतखेवों वोळखे । म्हणे तत्त्व हें मी ॥ ३६६ ॥

तिये ओळखीचिसरिसें । सुखाचिया साम्राज्यीं बैसे ।

मग आपणपां समरसें । विरोनि जाय ॥ ३६७ ॥

जयापरतें आणिक नाहीं । जयातें इंद्रियें नेणती कहीं ।

तें आपणचि आपुलिया ठायीं । होऊनि ठाके ॥ ३६८ ॥

**यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।**

**यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥२२ ॥**

मग मेरूपासूनि थोरें । देह दुःखाचेनि डोंगरें ।

दाटिजो पां पडिभरें । चित्त न दटे ॥ ३६९ ॥

कां शस्त्रें वरी तोडिलिया । देह अग्निमाजीं पडलिया ।

चित्त महासुखीं पहुडलिया । चेवोचि नये ॥ ३७० ॥

ऐसें आपणपां रिगोनि ठाये । मग देहाची वासु न पाहे ।

आणिकचि सुख होऊनि जाये । म्हणूनि विसरे ॥ ३७१ ॥

तं विद्याद् दु:खसंयोग वियोगं योगसंज्ञितम् ।

स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ॥ २३ ॥

जया सुखाचिया गोडी । मग आर्तीची सेचि सोडी ।

संसाराचिया तोंडीं । गुंतलें जें ॥ ३७२ ॥

जें योगाची बरव । संतोषाची राणिव ।

ज्ञानाची जाणीव । जयालागीं ॥ ३७३ ॥

तें अभ्यासिलेनि योगें । सावयव देखावें लागे ।

देखिलें तरी आंगें । होईजेल गा ॥ ३७४ ॥

संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषत: ।

मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य समन्तत: ॥ २४ ॥

तरि तोचि योगु बापा । एके परी आहे सोपा ।

जरी पुत्रशोकु संकल्पा । दाखविजे ॥ ३७५ ॥

हां विषयातें निमालिया आइके । इंद्रियें नेमाचिया धारणीं देखे ।

तरी हियें घालूनि मुके । जीवित्वासी ॥ ३७६ ॥

ऐसें वैराग्य हें करी । तरी संकल्पाची सरे वारी ।

सुखें धृतीचिया धवळारीं । बुद्धि नांदे ॥३७७ ॥

शनै: शनैरुपरमेत् बुद्ध्या धृतिगृहीतया ।

आत्मसंस्थं मन: कृत्वा न कींचिदपि चिन्तयेत् ॥ २५ ॥

यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम् ।

ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥२६ ॥

बुद्धी धैर्या होय वसौटा । मनातें अनुभवाचिया वाटा ।

हळु हळु करी प्रतिष्ठा । आत्मभुवनीं ॥ ३७८ ॥

याही एके परी । प्राप्ती आहे विचारीं ।

हें न ठके तरी सोपारी । आणिक ऐकें ॥ ३७९ ॥

आतां नियमुचि हा एकला । जीवें करावा आपुला ।

जैसा कृतनिश्चयाचिया बोला- । बाहेरा नोहे ॥ ३८० ॥

जरी येतुलेनि चित्त स्थिरावें । तरी काजा आलें स्वभावें ।

नाहीं तरी घालावें । मोकलुनी ॥ ३८१ ॥

मग मोकलिलें जेथ जाईल । तेथूनि नियमूचि घेउनि येईल ।

ऐसेनि स्थैर्यचि होईल । सावियाचि कीं ॥ ३८२ ॥

**प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ।**

**उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥ २७ ॥**

पाठीं केतुलेनि एके वेळे । तया स्थैर्याचेनि मेळें ।

आत्मस्वरूपाजवळें । येईल सहजें ॥ ३८३ ॥

तयातें देखोनि आंगा घडेल । तेथ अद्वैतीं द्वैत बुडेल ।

आणि ऐक्यतेजें उघडेल । त्रैलोक्य हें ॥ ३८४ ॥

आकाशीं दिसे दुसरें । तें अभ्र जैं विरे ।

तैं गगनचि कां भरे । विश्व जैसें ॥३८५ ॥

तैसें चित्त लया जाये । आणि चैतन्यचि आघवें होये ।

ऐसी प्राप्ति सुखोपायें । आहे येणें ॥ ३८६ ॥

**युञ्जन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः ।**

**सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते ॥२८ ॥**

या सोपिया योगस्थिती । उकलु देखिला गा बहुतीं ।
संकल्पाचिया संपत्ती । रुसोनियां ॥ ३८७ ॥
तें सुखाचेनि सांगातें । आलें परब्रह्मा आंतौतें ।
तेथ लवण जैसें जळातें । सांडूं नेणें ॥ ३८८ ॥
तैसें होय तिये मेळीं । मग सामरस्याचिया राउळीं ।
महासुखाची दिवाळी । जगेंसि दिसे ॥ ३८९ ॥
ऐसें आपुले पायवरी । चालिजे आपुले पाठीवरी ।
हें पार्था नागवे तरी । आन ऐकें ॥ ३९० ॥

**सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।**
**ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥ २९ ॥**
**यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।**
**तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ ३० ॥**

तरी मी तंव सकळ देहीं । असे एथ विचारु नाहीं ।
आणि तैसेंचि माझ्या ठायीं । सकळ असे ॥ ३९१ ॥
हें ऐसेंचि संचलें । परस्परें मिसळलें ।
बुद्धी घेपे एतुलें । होआवें गा ॥ ३९२ ॥
एऱ्हवीं तरी अर्जुना । जो एकवटलिया भावना ।
सर्वभूतीं अभिन्ना । मातें भजे ॥ ३९३ ॥
भूतांचेनि अनेकपणें । अनेक नोहे अंतःकरणें ।
केवळ एकत्वचि माझें जाणें । सर्वत्र जो ॥ ३९४ ॥
मग तो एक हा मियां । बोलता दिसतसे वायां ।
एऱ्हवीं न बोलिजे तरी धनंजया । तो मीचि आहें ॥ ३९५ ॥

दीपा आणि प्रकाशा । एकवंकीचा पाडु जैसा ।

तो माझ्या ठायीं तैसा । मी तयामाजीं ॥ ३९६ ॥

जैसा उदकाचेनि आयुष्यें रसु । कां गगनाचेनि मानें अवकाशु ।

तैसा माझेनि रूपें रूपसु । पुरुषु तो गा ॥३९७ ॥

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ।

सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥ ३१ ॥

जेणें ऐक्याचिये दिठी । सर्वत्र मातेंचि किरीटी ।

देखिला जैसा पटीं । तंतु एकु ॥३९८ ॥

कां स्वरूपें तरी बहुतें आहाती । परी तैसीं सोनीं बहुवें न होती ।

ऐसी ऐक्याचळाची स्थिती । केली जेणें ॥ ३९९ ॥

नातरी वृक्षांचीं पानें जेतुलीं । तेतुलीं रोपें नाहीं लाविलीं ।

ऐसी अद्वैतदिवसें पाहली । रात्री जया ॥ ४०० ॥

तो पंचात्मकीं सांपडे । तरी मग सांग पां कैसेनि अडे ? ।

जो प्रतीतीचेनि पाडें । मजसीं तुके ॥ ४०१ ॥

माझें व्यापकपण आघवें । गवसलें तयाचेनि अनुभवें ।

तरी न म्हणतां स्वभावें । व्यापकु जाहला ॥ ४०२ ॥

आतां शरीरीं तरी आहे । परी शरीराचा तो नोहे ।

ऐसें बोलवरी होये । तें करूं ये काई ॥ ४०३ ॥

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।

सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥३२ ॥

म्हणौनि असो तें विशेषें । आपणपेयांसारिखें ।

जो चराचर देखे । अखंडित ॥ ४०४ ॥

सुखदुःखादि वर्मे । कां शुभाशुभें कर्मे ।
दोनी ऐसीं मनोधर्मे । नेणेचि जो ॥ ४०५ ॥
हें सम विषम भाव । आणिकही विचित्र जें सर्व ।
तें मानी जैसे अवयव । आपुले होती ॥ ४०६ ॥
हें एकैक काय सांगावें । जया त्रैलोक्यचि आघवें ।
मी ऐसें स्वभावें । बोधा आलें ॥ ४०७ ॥
तयाही देह एकु कीर आथी । लौकिकीं सुखदुःखी तयातें म्हणती ।
परी आम्हांतें ऐसी प्रतीती । परब्रह्मचि हा ॥ ४०८ ॥
म्हणौनि आपणपां विश्व देखिजे । आणि आपण विश्व होईजे ।
ऐसें साम्यचि एक उपासिजे । पांडवा गा ॥ ४०९ ॥
हें तूतें बहुतीं प्रसंगीं । आम्ही म्हणों याचिलागीं ।
जे साम्यापरौती जगीं । प्राप्ति नाहीं ॥ ४१० ॥

**अर्जुन उवाच ।**

**योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ।**
**एतस्याहं न पश्यामि चंचलत्वात् स्थितिं स्थिराम् ॥ ३३ ॥**
**चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद् दृढम् ।**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥३४ ॥**

तंव अर्जुन म्हणे देवा । तुम्ही सांगा कीर आमुचिया कणवा ।
परी न पुरों जी स्वभावा । मनाचिया ॥ ४११ ॥
हें मन कैसें केवढें । ऐसें पाहों म्हणों तरी न सांपडे ।
एऱ्हवीं राहाटावया थोडें । त्रैलोक्य यया ॥ ४१२ ॥
म्हणौनि ऐसें कैसें घडेल । जे मर्कट समाधी येईल ।

कां राहा म्हणतलिया राहेल । महावातु ? ॥ ४१३ ॥

जें बुद्धीतें सळी । निश्चयातें टाळी ।

धैर्येसीं हातफळी । मिळऊनि जाय ॥ ४१४ ॥

जें विवेकातें भुलवी । संतोषासी चाड लावी ।

बैसिजे तरी हिंडवी । दाही दिशा ॥ ४१५ ॥

जें निरोधलें घे उवावो । जया संयमुचि होय सावावो ।

तें मन आपुला स्वभावो । सांडील काई ? ॥ ४१६ ॥

म्हणौनि मन एक निश्चळ राहेल । मग आम्हांसि साम्य होईल ।

हें विशेषेंही न घडेल । याचिलागीं ॥ ४१७ ॥

श्रीभगवानुवाच ।

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।

अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ॥३५ ॥

तंव कृष्ण म्हणती साचचि । बोलत आहासि तें तैसेंचि ।

यया मनाचा कीर चपळचि । स्वभावो गा ॥ ४१८ ॥

परि वैराग्याचेनि आधारें । जरी लाविलें अभ्यासाचिये मोहरें ।

तरी केतुलेनि एके अवसरें । स्थिरावेल ॥ ४१९ ॥

कां जें यया मनाचें एक निकें । जें देखिलें गोडीचिया ठाया सोके ।

म्हणौनि अनुभवसुखचि कवतिकें । दावीत जाइजे ॥ ४२० ॥

असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः ।

वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥३६ ॥

ऐऱ्हवीं विरक्ति जयांसि नाहीं । जे अभ्यासीं न रिघती कहीं ।

तयां नाकळे हें आम्हीही । न मनूं कायी ॥ ४२१ ॥

परि यमनियमांचिया वाटा न वचिजे। कहीं वैराग्याची से न करिजे।
केवळ विषयजळीं ठाकिजे। बुडी देउनी ॥ ४२२ ॥
यया जालिया मानसा कहीं। युक्तीची कांबी लागली नाहीं।
तरी निश्चळ होईल काई। कैसेनि सांगें ? ॥ ४२३ ॥
म्हणौनि मनाचा निग्रहो होये। ऐसा उपाय जो आहे।
तो आरंभीं मग नोहे। कैसा पाहों ॥ ४२४ ॥
तरी योगसाधन जितुकें। कें अवघेंचि काय लटिकें ?।
परि आपणयां अभ्यासूं न ठाके। हेंचि म्हण ॥ ४२५ ॥
आंगीं योगाचें होय बळ। तरी मन केतुलें चपळ ?।
काय महदादि हें सकळ। आपु नोहे ? ॥ ४२६ ॥
तेथ अर्जुन म्हणे निकें। देवो बोलती तें न चुके।
साचचि योगबळेंसीं न तुके। मनोबळ ॥ ४२७ ॥
तरी तोचि योगु कैसा केवीं जाणों।
आम्ही येतुले दिवस याची मातुही नेणों।
म्हणौनि मनातें जी म्हणों। अनावर ॥ ४२८ ॥
हा आतां आघवेया जन्मा। तुझेनि प्रसादें पुरुषोत्तमा।
योगपरिचयो आम्हां। जाहला आजी ॥ ४२९ ॥

**अर्जुन उवाच।**

**अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः।**
**अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥ ३७ ॥**
**कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति।**
**अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥ ३८ ॥**

एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ।

त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते ॥ ३९ ॥

परि आणिक एक गोसांविया । मज संशयो असे साविया ।

तो तूं वांचूनि फेडावया । समर्थु नाहीं ॥४३० ॥

म्हणौनि सांगें गोविंदा । कवण एकु मोक्षपदा ।

झोंबत होता श्रद्धा । उपायेंविण ॥ ४३१ ॥

इंद्रियग्रामोनि निघाला । आस्थेचिया वाटे लागला ।

आत्मसिद्धिचिया पुढिला । नगरा यावया ॥ ४३२ ॥

तंव आत्मसिद्धि न ठकेचि । आणि मागुतें न येववेचि ।

ऐसा अस्तु गेला माझारींचि । आयुष्यभानु ॥ ४३३ ॥

जैसें अकाळीं आभाळ । अळुमाळु सपातळ ।

विपायें आलें केवळ । वसे ना वर्षे ॥ ४३४ ॥

तैसीं दोन्ही दुरावलीं । जे प्राप्ती तंव अलग ठेली ।

आणि अप्राप्तीही सांडवली । श्रद्धा तया ॥ ४३५ ॥

ऐसा दोंला अंतरला कां जी । जो श्रद्धेच्या समाजीं ।

बुडाला तया हो जी । कवण गति ? ॥ ४३६ ॥

श्रीभगवानुवाच ।

पार्थ नैवेह नामुत्र विनाशः तस्य विद्यते ।

न हि कल्याणकृत्कश्चिदत् दुर्गतिं तात गच्छति ॥४० ॥

तंव कृष्ण म्हणती पार्था । जया मोक्षसुखीं आस्था ।

तया मोक्षावांचूनि अन्यथा । गती आहे गा ? ॥ ४३७ ॥

परि एतुलें हेंचि एक घडे । जें माझारीं विसावें पडे ।

तेंही परी ऐसेनि सुरवाडें । जो देवां नाहीं ॥ ४३८ ॥

एऱ्हवीं अभ्यासाचा उचलता । पाउलीं जरी चालता ।

तरी दिवसाआधीं ठाकिता । सोऽहंसिद्धीतें ॥ ४३९ ॥

परि तेतुला वेगु नव्हेचि । म्हणौनि विसांवा तरी निकाचि ।

पाठीं मोक्षु तंव तैसाचि । ठेविला असे ॥ ४४० ॥

**प्राप्य पुण्यकृतां लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।**

**शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥ ४१ ॥**

ऐकें कवतिक हें कैसें । जें शतमखा लोक सायासें ।

तें तो पावे अनायासें । कैवल्यकामु ॥ ४४१ ॥

मग तेथिंचे जे अमोघ । अलौकिक भोग ।

भोगितांही सांग । कांटाळे मन ॥ ४४२ ॥

हा अंतरायो अवचितां । कां वोढवला भगवंता ? ।

ऐसा दिविभोग भोगितां । अनुतापी नित्य ॥ ४४३ ॥

पाठीं जन्में संसारीं । परि सकळ धर्मांचिया माहेरीं ।

लांबा उगवे आगरीं । विभवश्रियेचा ॥ ४४४ ॥

जयातें नीतिपंथें चालिजे । सत्यधूत बोलिजे ।

देखावें तें देखिजे । शास्त्रदृष्टीं ॥ ४४५ ॥

वेद तो जागेश्वरु । जया व्यवसाय निजाचारु ।

सारासार विचारु । मंत्री जया ॥ ४४६ ॥

जयाच्या कुळीं चिंता । जाली ईश्वराची पतिव्रता ।

जयातें गृहदेवता । आदि ऋद्धि ॥ ४४७ ॥

ऐसी निजपुण्याची जोडी। वाढिन्नली सर्वसुखाची कुळवाडी।
तिये जन्मे तो सुखाडी। योगच्युतु ॥ ४४८ ॥

**अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम्।**
**एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥ ४२ ॥**
**तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम्।**
**यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन ॥ ४३ ॥**

अथवा ज्ञानाग्निहोत्री। जे परब्रह्मण्यश्रोत्री।
महासुखक्षेत्रीं। आदिवंत ॥ ४४९ ॥
जे सिद्धांताचिया सिंहासनीं। राज्य करिती त्रिभुवनीं।
जे कूजती कोकिल वनीं। संतोषाच्या ॥ ४५० ॥
जे विवेकद्रुमाचे मुळीं। बैसले आहाति नित्य फळीं।
तया योगियांचिया कुळीं। जन्म पावे ॥ ४५१ ॥
मोटकी देहाकृति उमटे। आणि निजज्ञानाची पाहांट फुटे।
सूर्यापुढें प्रगटे। प्रकाशु जैसा ॥४५२ ॥
तैसी दशेची वाट न पाहतां। वयसेचिया गांवा न येतां।
बाळपणींच सर्वज्ञता। वरी तयातें ॥ ४५३ ॥
तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें। मनचि सारस्वतें दुभे।
मग सकळ शास्त्रे स्वयंभें। निघती मुखें ॥ ४५४ ॥
ऐसें जे जन्म। जयालागीं देव सकाम।
स्वर्गीं ठेले जप होम। करिती सदा ॥४५५ ॥
अमरीं भाट होईजे। मग मृत्युलोकातें वानिजे।
ऐसें जन्म पार्था गा जे। तें तो पावे ॥ ४५६ ॥

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रिं यते ह्यवशोऽपि सः ।

जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥ ४४ ॥

आणि मागील जे सद्बुद्धि । जेथ जीवित्वा जाहाली होती अवधि ।

मग तेचि पुढती निरवधि । नवी लाहे ॥ ४५७ ॥

तेथ सदैवा आणि पायाळा । वरी दिव्यांजन होय डोळां ।

मग देखे जैसी अवलीळा । पाताळधनें ॥ ४५८ ॥

तैसें दुर्भेद जे अभिप्राय । कां गुरुगम्य हन ठाय ।

तेथ सौरसेंवीण जाय । बुद्धि तयाची ॥ ४५९ ॥

बळियें इंद्रियें येती मना । मन एकवटे पवना ।

पवन सहजें गगना । मिळोंचि लागे ॥ ४६० ॥

ऐसें नेणों काय आपैसें । तयातेंचि कीजे अभ्यासें ।

समाधि घर पुसे । मानसाचें ॥ ४६१ ॥

जाणिजे योगपीठीचा भैरवु । काय हा आरंभरंभेचा गौरवु ।

कीं वैराग्यसिद्धीचा अनुभवु । रूपा आला ॥४६२ ॥

हा संसारु उमाणितें माप । कां अष्टांगसामग्रीचें द्वीप ।

जैसें परिमळेंचि धरिजे रूप । चंदनाचें ॥ ४६३ ॥

तैसा संतोषाचा काय घडिला । कीं सिद्धिभांडारींहूनि काढिला ।

दिसे तेणें मानें रूढला । साधकदशे ॥ ४६४॥

प्रयत्नाद् यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।

अनेकजन्मसंसिद्धः ततो याति परां गतिम् ॥ ४५ ॥

जे वर्षशतांचिया कोडी । जन्मसहस्रांचिया आडी ।

लंघितां पातला थडी । आत्मसिद्धीची ॥ ४६५ ॥

म्हणौनि साधनजात आघवें । अनुसरे तया स्वभावें ।

मग आयतिये बैसे राणिवे । विवेकाचिये ॥ ४६६॥

पाठीं विचारितया वेगां । तो विवेकुही ठाके मागां ।

मग अविचारणीय तें आंगा । घडोनि जाय ॥ ४६७ ॥

तेथ मनाचें मेहुडें विरे । पवनाचें पवनपण सरे ।

आपणपां आपण मुरे । आकाशही ॥ ४६८ ॥

प्रणवाचा माथा बुडे । येतुलेनि अनिर्वाच्य सुख जोडे ।

म्हणौनि आधींचि बोलु बहुडे । तयालागीं ॥ ४६९ ॥

ऐसी ब्रह्मींची स्थिती । जे सकळां गतींसी गती ।

तया अमूर्ताची मूर्ति । होऊनि ठाके ॥ ४७० ॥

तेणें बहुतीं जन्मीं मागिलीं । विक्षेपांचीं पाणिवळें झाडिलीं ।

म्हणौनि उपजतखेंवो बुडाली । लग्नघटिका ॥ ४७१ ॥

आणि तद्रूपतेसीं लग्न । लागोनि ठेलें अभिन्न ।

जैसे लोपलें अभ्र गगन । होऊनि ठाके ॥ ४७२ ॥

तैसें विश्व जेथ होये । मागौतें जेथ लया जाये ।

तें विद्यमानेंचि देहें । जाहला तो गा ॥ ४७३ ॥

**तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।**

**कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥ ४६ ॥**

जया लाभाचिया आशा । करूनि धैर्यबाहूंचा भरंवसा ।

घालीत षट्कर्मांचा धारसां । कर्मनिष्ठ ॥ ४७४ ॥

कां जिये एक वस्तूलांगीं । बाणोनि ज्ञानाची वज्रांगी ।

झुंजत प्रपंचेंशीं समरंगीं । ज्ञानिये गा ॥ ४७५ ॥

अथवा निलागें निसरडा । तपोदुर्गाचा आडकडा ।

झोंबती तपिये चाडा । जयाचिया ॥ ४७६ ॥

जें भजतियां भज्य । याज्ञिकांचें याज्य ।

एवं जें पूज्य । सकळां सदा ॥ ४७७ ॥

तेंचि तो आपण । स्वयें जाहला निर्वाण ।

जें साधकांचें कारण । सिद्ध तत्त्व ॥ ४७८ ॥

म्हणौनि कर्मनिष्ठा वंद्यु । तो ज्ञानियांसि वेद्यु ।

तापसांचा आद्यु । तपोनाथु ॥ ४७९ ॥

पैं जीवपरमात्मसंगमा । जयाचें येणें जाहलें मनोधर्मा ।

तो शरीरीचि परी महिमा । ऐशी पावे ॥ ४८० ॥

म्हणौनि याकारणें । तूंतें मी सदा म्हणें ।

योगी होई  अंतःकरणें । पंडुकुमरा॥ ४८१ ॥

**योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना ।**

**श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥४७ ॥**

**ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे**

**श्रीकृष्णार्जुनसंवादे ध्यानयोगो नाम षष्ठोध्यायः ॥ ६ ॥**

अगा योगी जो म्हणिजे । तो देवांचा देवो जाणिजे ।

आणि सुख सर्वस्व माझें । चैतन्य तो ॥४८२ ॥

तेथ भजता भजन भजावें । हें भक्तिसाधन जें आघवें ।

तो मीचि जाहलों अनुभवें । अखंडित ॥ ४८३ ॥

मग तया आम्हां प्रीतीचें । स्वरूप बोलीं निर्वचे ।

ऐसें नव्हे गा तो साचें । सुभद्रापती ॥ ४८४ ॥

तया एकवटलिया प्रेमा । जरी पाडें पाहिजे उपमा ।

तरी मी देह तो आत्मा । हेंचि होय ॥ ४८५ ॥

ऐसे भक्तचकोरचंद्रें । त्रिभुवनैकनरेंद्रें ।

बोलिलें गुणसमुद्रें । संजयो म्हणे ॥ ४८६ ॥

तेथ आदिलापासूनि पार्था । ऐकिजे ऐसीचि आस्था ।

दुणावली हें यदुनाथा । भावों सरलें ॥ ४८७ ॥

कीं साविायाचि मनीं संतोषला । जे बोला आरिसा जोडला ।

तेणें हरिखें आतां उपलवला । निरूपील ॥ ४८८ ॥

तो प्रसंगु आहे पुढां । जेथ शांतु दिसेल उघडा ।

तो पालविजेल मुडा । प्रमेयबीजाचा ॥ ४८९ ॥

जें सात्त्विकाचेनि वडपें । गेलें आध्यात्मिक खरपें ।

सहजें निडारले वाफे । चतुरचित्ताचे ॥ ४९० ॥

वरी अवधानाचा वाफसा । लाधला सोनया ऐसा ।

म्हणौनि पेरावया धिंवसा । श्रीनिवृत्तीसी ॥ ४९१ ॥

ज्ञानदेव म्हणे मी चाडें । सद्गुरूनीं केलें कोडें ।

माथां हात ठेविला तें फुडें । बीजचि वाइलें ॥ ४९२ ॥

म्हणौनि येणें मुखें जें जें निगे । तें संतांच्या हृदयीं साचचि लागे ।

हें असो सांगों श्रीरंगें । बोलिलें जें ॥ ४९३ ॥

परी तें मनाच्या कानीं ऐकावें । बोल बुद्धीच्या डोळां देखावें ।

हे सांटोवाटीं घ्यावें । चित्ताचिया ॥ ४९४ ॥

अवधानाचेनि हातें । नेयावें हृदयांआतौतें ।

हे रिझवितील आयणीतें । सज्जनांचिये ॥ ४९५ ॥

हे स्वहितातें निववितीं । परिणामातें जीववितीं ।
सुखाची वाहविती । लाखोली जीवां ॥ ४९६ ॥

आतां अर्जुनेंसीं श्रीमुकुंदें । नागर बोलिजेल विनोदें ।
तें वोंवियेचेनि प्रबंधें । सांगेन मी ॥ ४९७ ॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां षष्ठोऽध्यायः ॥